# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
# दिनांक 25/01/2020 (मंगळवार)
# (सकाळ)

---

## अपघातात मृत्यू

1) पो.स्टे. भिवापुर :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील मौजा गोडबोरी शिवार येथे दिनांक 24/02/2020 चे 11:00 वा. दरम्यान एमएच– 40/ बीजी– 3114 क्रमांकाचा टिप्परचा चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालविल्याने एमएच– 49/ एएस– 2566 क्रमांकाच्या कारला धडक दिली. या अपघातात कार मधील इसम नामे– चंद्रकांत पुंडलीक गजभिये, वय 55 वर्ष, रा. नागपूर हे गंभीर जखमी होवुन ग्रामीण रूग्णालय भिवापुर येथे त्यांचा मृत्यू झाला. तर कार चालक बबन एन गांजरे, वय 48 वर्ष, रा. नागपूर हे जखमी झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– हरीष पुडंलिकराव गजभिये, वय 48 वर्ष, रा. सुयोग नगर नागपुर यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापुर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 304 (अ) भादंवी. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. शरद भस्मे 9764946808 हे करीत आहे.

2) पो.स्टे. कुही :– अंतर्गत 28 कि.मी. अंतरावरील मौजा उटी शिवार नागपूर उमरेड रोड येथे दिनांक 22/02/2020 चे 15:30 वा. दरम्यान अज्ञात चार चाकी वाहन चालक आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने चालवुन एमएच– 40/ एडब्ल्यु– 8310 क्रमांकाच्या मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल स्वार रमेश किसन जळीत, वय 57 वर्ष, रा. मकरधोकडा हे गंभीर जखमी झाल्याने त्यांना उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता दिनांक 22/02/2020 चे 18:45 वा. त्यांचा मृत्यू झाला. तर त्यांच्या पत्नी या किरकोळ जखमी झाल्या.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विनोद निलकंठराव शिंदे, वय 35 वर्ष, रा. मकरधोकडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कुही येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 337, 338, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक श्री. कमलेश सोनटक्के 9422644538 हे करीत आहे.

## चोरी

पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 15 कि.मी अंतरावर अंबाझारी येथे दिनांक 23/02/2020 चे 18:00 वा. ते दिनांक 24/02/2020 चे 09:00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– गोविंद बापुराव चंद्रवंशी, वय 49 वर्ष, रा. पवनी यांनी अंबाझरी बिट क्षेत्रातील कक्ष क्र. 598 मध्ये प्रण्यांची गणना करण्याकरीता लावलेले 2 डिजीटल कॅमेरे किंमती 30,000/– रू. चा मुद्येमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार उईके 770824629 हे करीत आहे.

## विनयभंग

पो.स्टे. पारशिवनी:– दिनांक 24/02/2020 चे 14.30 वा. दरम्यान 15 वर्षीय अल्पवयीन फिर्यादी/पीडित ही बैलबंडीने घरी एकटी जात असतांना आरोपी नामे– मेहतलाल प्यारेलाल परतेती, वय 23 वषे, रा. छिंदवाडा याने तिला रस्त्यात अडवुन पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीविरुध्द कलम 354, 341 भादंवी. सहकलम 8, 12 बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि एन. जि. भुते या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर